N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाजार
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 1031 **Year (वर्ष):** 2025
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/12/2025 09:34

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 15/12/2025
      **Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/12/2025
      **Time From (वेळेपासून):** 18:27 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 18:27 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 16/12/2025 **Time (वेळ):** 09:00 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 019
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/12/2025 09:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** तहसिल कार्यालय, उत्तर सोलापूर, सोलापूर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): प्रविण नारायण निंबाळकर

(b) **Father's Name** (वडील चे नाव) : नारायण निंबाळकर

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.** (पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,पुणे,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,पुणे,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9552574140

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | चंद्रकांत काशिनाथ हेडगिरे | | | 1. तहसिल कार्यालय,उत्तर सोलापुर ,सोलापुर ,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

पोलीस निरिक्षक सदर बझार
सत्यमेव जयते
पोलीस स्टेशन सोलापूर शहर

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद तारीख 16.12.2025

मी प्रविण नारायण निंबाळकर,वय-39 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.9552574140.

मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 05.12.2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,पुणे येथे हजर असताना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी तक्रारदार श्री.सुनिल देविदास पाटील यांची लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून आपण सदर तक्रारदार यांची तक्रार ऐकुण घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे सांगुन त्यासाठी पथक व शासकिय वाहन उपलब्ध करुन दिले तसेच उपसंचालक शिक्षण विभाग,पुणे येथील 1)श्रीमती सुनिता कुमार माने पद -कनिष्ठ लिपीक 2)श्री.छत्रगुण ज्ञानोबा कदम कनिष्ठ लिपीक पंच उपलब्ध करुन दिले.दोन्ही पंच आमचे कक्षात हजर झाले नंतर त्यांना तेथे उपस्थित असलेले इसम श्री.सुनिल देविदास पाटील यांची ओळख करुन दिली व घेतली.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना तक्रारदार श्री.सुनिल देविदास पाटील यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला.त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्रीमती सुनिता कुमार माने व पंच क्र.2 म्हणून श्री.छत्रगुण ज्ञानोबा कदम हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन करुन हस्तलिखीत तक्रार दिली की,

श्री.सुनिल देवीदास पाटील (घुगे) वय-47 वर्षे व्यवसाय नोकरी – पद मंडल अधिकारी रा.ए – 345 सिंधु विहार जुळे सोलापुर जि.सोलापुर मो.नं.9890120085. हे मंडल अधिकारी म्हणुन सोरेगाव मंडल अधिकारी कार्यालय येथे कार्यरत आहेत.त्यांची मंडल अधिकारी म्हणुन पदोन्नतीने नेमणुक माहे एप्रिल 2025 रोजी मा. जिल्हाधिकारी सोलापुर यांचे आदेशान्वये झालेली आहे.माहे एप्रिल 2025 पासुन आजतागायत त्यांना पगार मिळालेला नाही.याबाबत त्यांनी वारंवार मा.तहसिलदार सो.उत्तर सोलापुर यांना विनंती केलेली आहे.परंतु तहसिलदार यांनी मंडल अधिकारी यांना पगार कशाला लागतो असे बोलुन ती बाब गांभिर्यपुर्वक न घेता आपली जबाबदारी झटकून दिली.त्यानंतर तक्रारदार यांनी अनेकवेळा मिटींगमध्ये पगाराबाबत विषय काढला असता तहसिलदार यांनी उत्तर दिले नाही.त्यानंतर दि.04/12/2025 रोजी तक्रारदार हे निवासी नायब तहसिलदार चंद्रकांत हेडगिरे यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना लवकरात लवकर त्यांचे पगार पत्रक तयार करुन साहेबांना सांगुन पगार करुन देतो त्यासाठी 40 हजार दयावे लागतील असे सांगुन तक्रारदार यांचेकडे 40,000/- रुपयाची मागणी केली.नायब तहसिलदार हेडगिरे मागत असलेले 40000/- रुपये ही लाच रक्कम असुन ती देणेची तक्रारदार यांची इच्छा नसलेने त्यांचेवर कार्यवाही व्हावी अशा आशयाची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे यांचेकडे तक्रार दिली सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.

त्यानंतर आम्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री.पाटील यांना पुढील कारवाई बाबत विचारणा करता तक्रारदार यांनी सांगितले की,मी संपर्क करेल त्यावेळी तुम्ही सोलापुर येथे या त्यावेळी पुढील कारवाई करु. त्यानंतर तक्रारदार यांनी दि.14/12/2025 रोजी संपर्क करुन तक्रारदार यांना लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे यांनी भेटण्यासाठी दि. 15/12/2025 रोजी बोलावले असलेने पुढील कारवाई दि.15/12/2025 रोजी करणेचे ठरले.

आम्ही दि.14/12/2025 रोजी दिलेल्या सुचने प्रमाणे दि.15/12/2025 रोजी सकाळी 06.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दोन्ही पंच व सापळा पथक हजर झाले. त्यानंतर 06.15 वा चे सुमारास शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईसाठी लागणारे साहीत्य घेऊन ला.प्र.वि कार्यालय पुणे येथुन रवाना होऊन सोलापुर येथे सावण हॉटेल येथे पोहोचलो ती वेळ 12.00 वा ची होती.सदर ठिकाणी तक्रारदार

पाटील उपस्थित होते.

त्यानंतर तक्रारदार श्री.पाटील यांना चंद्रकांत हेडगिरे ,नायब तहसिलदार उत्तर सोलापुर यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता पाठविण्याचे ठरलेने आमचेकडील शासकिय व्हॉईस रेकॉर्डर मध्ये पंचासमक्ष नवीन सिलबंद मेमरी कार्ड त्याचे एका बाजुस Sandisk Ultra 32GB C10 A1 Micro SD 1U HC I व त्याचे दुस-या बाजुस 5417DXJE6016 BM MADE IN CHINA अशा वर्णनाचे टाकले व तक्रारदार श्री.सुनिल पाटील यांचे पडताळणी कारवाईचे अनुषंगाने निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 12.42 वा.ची होती.सदर निवेदन घेतेवेळी नवीन मेमरी कार्ड त्याचे एका बाजुस Lexar Micro SD HC I V10 1U A1 633x 32GB व त्याचे दुस-या बाजुस FC CE L112925 0032A2A82 W2445111164M मध्ये पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे.

त्यानंतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार ,दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देण्यात आल्या त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो आम्ही तक्रारदार श्री.पाटील यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस चालु करुन लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्रीमती माने यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहन मधुन तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर येथे रवाना केले ती वेळ 13.01 वा ची होती.

त्यानंतर थोड्या वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 13.43 वा ची होती. त्यावेळी आम्ही पंच क्र.01 श्रीमती माने यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व तक्रारदार पाटील असे तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर येथे गेलो असता सदर ठिकाणी चंद्रकांत हेडगिरे,नायब तहसिलदार हे त्यांचे कार्यालयात उपस्थित होते.सदर वेळी तक्रारदार यांनी पगार कधी होईल, नऊ महिने झाल रावसाहेब तेच चालु हाय असे विचारले त्यावर हेडगिरे यांनी नाई उदया.नाय परवा दिवशी...शुक्रवारी असे म्हणाले त्यानंतर ..नायब तहसिलदार हेडगिरे यांनी, “हा काय करता मंग हयाच” असे बोलुन हाताने इशारा करुन पैशाची मागणी केली त्यावर तक्रारदार यांनी किती देऊ? असे विचारले असता सांगितले प्रमाणे “सिक्स झिरो,तुमच्या हयान बघा.तुम्हाला ते सांगितलय” असे म्हणुन साठ हजाराची मागणी केली तसेच” “तुम्ही हिकड केल की, त्यानंतर आम्ही तिकड करतो तुमच” असे म्हणुन,”कस करताव..बघा काय करता येतय असे हेडगिरे यांनी तक्रारदार यांना विचारले असता तक्रारदार यांनी किती”? असे विचारले असता त्यावर हेडगिरे हे “सिक्स झिरो करा असे म्हणले त्यावर तक्रारदार यांनी “चाळीस म्हणाला होता ना? असे विचारणा केली असता, मग “तुम्ही आलेच नाय ना दोन दिवस...वाढवू?” असे बोलले त्यावर तक्रारदार पाटील “नाय वाढवू नका...तुम्ही चाळीस म्हणताय परंतु पस्तीसमधी करा” असे म्हणाले असता हेडगिरे यांनी हे नाही असे म्हणुन “सिक्स झीरोमधी वाढणार कमी होणार नाही” असे म्हणाले.त्यावर तक्रारदार यांनी दिवसाला वाढवताय काय.? असे विचारले असता हेडगिरे यांनी, “एक पण कमी होणार नाय” असे म्हणुन पैशाची मागणी केली असता त्यावर तक्रारदार यांनी “चाळीस करा..नाय ओ रावसाहेब तेवढ...चाळीस” असे बोलले असता हेडगिरे यांनी, “थोड अॅड करा....मी म्हणतु ते सिक्स झीरो..अं..वन झिरो अॅड करा”असे म्हणुन पैशाची मागणी केली.त्यानंतर तक्रारदार यांनी तहसिलदार यांची भेट करणेसाठी हेडगिरे यांचेकडे विचारणा केली त्यानंतर हेडगिरे व तक्रारदार तहसिलदार यांचे केबीनकडे जाणेस निघाले त्यावेळी हेडगिरे यांनी तक्रारदार यांना” करुन टाका की,.... हितच करून टाकायच असे म्हणुन हाताने इशा-याने लागलीच रक्कम देणेस सांगितले. त्यानंतर तक्रारदार व लोकसेवक हेडगिरे तहसिलदार यांचे केबीनकडे गेले परंतु तहसिलदार नसलने भेट झाली नाही.त्यानंतर तक्रारदार यांनी “पस्तीस दिले तर चालतील का?” असे विचारले असता “नाय ती चाळीस करून टाका” असे म्हणुन चाळीस हजाराची मागणी केली. तक्रारदार व नायब तहसिलदार हेडगिरे यांचे भेटीवेळी पंच क्र.01 श्रीमती माने या समक्ष हजर होत्या पडताळणी कारवाई वेळीचे झालेले संभाषण पंच क्र.01 यांचे समक्ष झाले असुन ते त्यांनी ऐकले व पाहीले आहे या संभाषणा दरम्यान नायब तहसिलदार हेडगिरे यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडीअंती 40000/- लाच मागणी केली आहे.त्यानंतर तक्रारदार यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता तक्रारदार यांनी पंच क्र.01 श्रीमती माने यांचेप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.पाटील यांना तहसिलदार उत्तर सोलापुर यांचेकडे पडताळणी करणे आवश्यक असलेचे तक्रारदार यांना सांगितले तसेच संशय येऊ नये म्हणुन पंच क्र.02 कदम यांना तक्रारदाराचे सोबत पडताळणीवेळी पाठवणेचे सर्वानुमते ठरले व त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी उपस्थित पंच साक्षीदार, तक्रारदार व सापळा पथकास पुढील पडताळणी कार्यवाहीचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.सुनिल पाटील यांनी परिधान केलेल्या शर्टचे आतील बाजुस व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.02 कदम यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील चारचाकी गाडी मधुन तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर येथे रवाना केले ती वेळ 15.27 वा ची होती. त्यानंतर आम्ही,सापळा पथक व आम्हा पंच क्र.01 श्रीमती माने असे सावण हॉटेल ,पहीला मजला येथे थांबुन राहिलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं.02 असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले.त्यावेळी पोशि तावरे यांनी तक्रारदार यांचे अंगावरील व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 16.10 वा.ची होती. त्यानंतर पोलीस निरीक्षक निंबाळकर यांनी तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की,मी व पंच क्र.02 कदम असे तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर यांच कार्यालयात गेलो असता त्यावेळी तक्रारदार यांनी तहसिलदार निलेश पाटील यांना पगाराच सर दुसर काय पगार...मुलाची वैगरे फी भरायची होती असे बोलले असता तहसिलदार यांनी "केल..केल पाठवून दिल" असे बोलले.त्यावर तक्रारदार हे तहसिलदार यांना "सकाळी बोललो होते हेडगिरे रावसाहेबांना" असे बोललो असता "परवाच पाठवलय" असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी कागदपत्राची सगळी म्हणजे पुर्तता केली असे म्हणाले असता त्यांनी ठिकय दुसर काय अजुन अशी विचारणा केली असता मी "सकाळी बोललो हेडगिरे रावसाहेबांना..झालय म्हणलय ती पाठवलय म्हणलय ते" असे म्हणुन कार्यालयाचे बाहेर आलो त्यानंतर मी व पंच आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यानंतर आम्ही पंच क्र. 02 कदम यांना गेले पासुन येई पर्यंत काय झाले याबाबत विचारणा करता पंच क्र.02 कदम यांनीही मिळतीजुळती हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.2 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरी असलेबाबतची खात्री केली.

एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे चंद्रकांत हेडगिरे,नायब तहसिलदार उत्तर सोलापुर यांचेकडे आज दि.15/12/2025 रोजी पडताळणी कामी तक्रारदार यांचेकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान चंद्रकांत हेडगिरे यांनी तक्रारदार यांचे माहे एप्रिल 2025 पासुन आजपर्यंत थकित पगार मिळण्यासाठीची प्रक्रिया राबवुन पगार बिल पुढे पाठवले आहे असे सांगुन पगार काढण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 60,000/- रुपये लाचेची मागणी करुन
तडजोडीअंती यांनी 40,000/- रुपयाची लाच मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.सदर पडताळणीवेळी तक्रारदार श्री.पाटील व लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे यांचेत समोरासमोर झालेल्या व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषणाची ट्रान्सस्क्रीप्ट पोशि तावरे यांनी पंच व तक्रारदार यांचे मदतीने तयार करणेत आली आहे.सदरबाबत सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर आम्ही दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार सुनिल पाटील यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता त्यांनी लाच रक्कम 40,000/- रुपये हजर केले.त्यानंतर पोहवा पोशि तावरे यांनी नमुद नोटांचे नंबर पंच क्र.02 कदम यांचे मदतीने कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या.
त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम"जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण करण्यात येणार असल्याचे सांगितले.त्यानंतर आम्ही सावण हॉटेल मधील पहील्या मजल्यावरील रुम मध्ये दोन्ही पंचांना व तक्रारदार पाटील यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

त्यानंतर आम्ही लाचेकामी वापरावयाची रक्कम रूपये 40,000/- (रूपये 500/- दराच्या 80 चलनी नोटा) ही चालक पेशि /4334 कदम यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, चालक पोशि कदम यांनी कापसाच्या बोळ्याने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडर लावली.त्यानंतर चालक पोशि कदम यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार सुनिल पाटील यांच्या नेसणीस असलेल्या पांढ-या रंगाच्या फुल पॅन्टच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशात ठेवली.

त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून व मपोहवा गोरे यांनी मोबाईल मधील कॅमेरामधील व्हिडीओ रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये तक्रारदार पाटील त्यानंतर दोन्ही पंचांचे सापळा निवेदन घेतले ती वेळ 17.41 वा होती.

त्यानंतर चंद्रकांत हेडगिरे ,नायब तहसिलदार उत्तर सोलापुर यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार ,पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देऊन तक्रारदार यांना शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन लावुन देऊन शासकिय पंच क्र.2 श्री.कदम यांचेसह तक्रारदार यांचेकडील चारचाकी वाहन मधुन तहसिल कार्यालय, उत्तर सोलापुर येथे जाणेसाठी 17.50 वा. चे सुमारास सावण हॉटेल उत्तर सोलापुर येथुन रवाना केले व त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले व तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर येथील कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र.02 व सापळा पथक चालत तक्रारदार

पोलीस निरिक्षक सदर बझार पोलीस स्टेशन सोलापुर शहर सत्यमेव जयते

यांचे पाठोपाठ निघालो व तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर कार्यालयाच्या आवारात सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो.तक्रारदार व पंच क्र.02 कदम हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले थोडया वेळाने तक्रारदार यांनी रुमालाने चष्मा पुसुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला.

त्यानंतर आम्ही,पंच क्र.02 व पथक तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर येथील चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार यांचे कार्यायालत गेलो आम्ही दिलेल्या सुचनेनुसार मपोहवा गोरे यांनी तात्काळ शासकिय कॅमेरामध्ये चित्रीकरणास सुरुवात केली.त्यानंतर आम्ही तक्रारदार जाधव यांना लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 18.27 वा.ची होती.

त्यावेळी पंच क्रमांक 2 श्री.कदम यांनी अंगुली निर्देश करुन हेच लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार असल्याचे सांगितले.त्यावेळी लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार यांचे दोन्ही हात पोशि/तावरे यांनी पकडले व आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली.त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.02 कदम यांना लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार यांनी स्विकारलेली लाच रक्कम कुठे ठेवली आहे असे विचारले असता तक्रारदार यांनी लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार यांनी लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन उजव्या हातात घेऊन त्यांनी परीधान केलेल्या राखाडी रंगाच्या जिन्स पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांनी परीधान केलेल्या राखाडी रंगाच्या जिन्स पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये असल्याचे सांगितले.त्यानंतर पंचासमक्ष लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार यांनी लाच रक्कम त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशातुन काढली असता लगेचच पोशि तावरे यांनी लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार यांचे अनुक्रमे डावा व उजवा हात मनगटाजवळ पकडून त्यांचे दोन्ही हात व कपडयाचा कोठेही स्पर्श होणार नाही याची दक्षता घेतली.

त्यावेळी पंच क्र.1 श्रीमती माने यांनी लाचेची रक्कम ताब्यात घेवून मोजली असता ती रुपये 40,000/- असल्याचे दिसून आले.त्यानंतर सदर नोटांचे सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता ते तंतोतंत जुळून आले.त्यानंतर लोकसेवक यांच्या ताब्यात घेतलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार यांची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताला व पॅन्टचे पुढील बाजुचे उजव्या खिशाला अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगांची चकाकी दिसून आली. तसेच तक्रारदार पाटील यांच्या हाताची व कपडयांची तपासणी केली असता,पाटील यांच्या दोन्ही हाताच्या बोटांच्या वरील भागास अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पॅन्टच्या पुढील बाजूच्या उजव्या खिशाचे तोडांवर व आतील बाजुस अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर पंच क्र.01 श्रीमती माने यांचे हाताची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हातास अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.

त्यानंतर लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव. श्री.चंद्रकांत काशिनाथ हेडगिरे वय 52 वर्षे ,व्यवसाय - नोकरी पद- निवासी नायब तहसिलदार,उत्तर सोलापुर रा.शिवरत्न नगर फलॅट नं.81/82 जुळे सोलापुर असे सांगितले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.पाटील यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंचासमक्ष सांगितले की, मी व पंच क्र.2 कदम यांचेसह तहसिल कार्यालय उत्तर सोलापुर येथे चंद्रकांत हेडगिरे यांचे कार्यालयात जाऊन चंद्रकांत हेडगिरे यांची भेट घेतली असता त्यांनी "काय,काय झाल? असे म्हणुन इशा-याने पैशाची मागणी केली असता "40 हजार आहेत, मोजून घ्या" असे म्हणुन मी माझे नेसत्या पँटच्या उजव्या खिशामध्ये असलेली 40,000/- रुपये लाच रक्कम माझ्या उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली असता लोकसेवक चंद्रकांत हेडगिरे यांनी लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांनी परीधान केलेल्या राखाडी रंगाच्या जिन्स पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी बाहेर येऊन पुर्व नियोजित इशारा केला.त्यानंतर पंच क्र.2 श्री.कदम यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनी ही तक्रारदार यांचे प्रमाणे हकिकत सांगितली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

तरी दि.05.12.2025 रोजी तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे चंद्रकांत हेडगिरे नायब तहसिलदार उत्तर सोलापुर यांचेकडे आज दि.15/12/2025 रोजी पडताळणी कामी तक्रारदार यांच्याकडे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान निवासी नायब तहसिलदार , चंद्रकांत हेडगिरे यांनी तक्रारदार यांचे माहे एप्रिल 2025 पासुन आजपर्यंत थकित पगार मिळण्यासाठीची प्रक्रिया

राबवुन पगार बिल पुढे पाठवले आहे असे सांगुन पगार काढण्यासाठी तक्रारदार यांचेकडे 60,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 40,000/- रुपयाची लाच मागणी करुन सापळा कारवाई वेळी पंचासमक्ष 40,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार सुनिल पाटील यांचेकडुन स्विकारली म्हणुन माझी श्री.चंद्रकांत काशिनाथ हेडगिरे वय 52 वर्षे ,व्यवसाय - नोकरी पद- निवासी नायब तहसिलदार,तहसिल कार्यालय,उत्तर सोलापुर.
रा.शिवरत्न नगर फलॅट नं.81/82 जुळे सोलापुर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला....

पोलीस निरिक्षक सदर बझार
सत्यमेव जयते
पोलीस स्टेशन सोलापूर शहर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

namdev vitthal bandgar(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस निरिक्षक सदर बझार
सत्यमेव जयते
पोलीस स्टेशन सोलापूर शहर

पोलीस ठाणे अमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** namdev vitthal ban
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pi